JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# ‘ मराठी कवितेतील वृक्ष’

डॉ. संजय जनार्दन आगलावे

सहयोगी प्राध्यापक ( मराठी विभाग )

जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जिल्हा अमरावती.

प्रस्तावना

मराठी साहित्यात अनेक विषयांवर कविता लिहलेल्या आहेत निसर्गाच्या विविध घटकांना मानवी भावभावनांचा आरोप करत किंवा निसर्गाचे दर्शन घडवत मानवी भावभावनांचा वेध घेण्याचा प्रयत्न अनेक मराठी कवी करतांना दिसतात, झाडे, फुले, धरयत्री ,पक्षी , अशा बहुविध निसर्गाच्या घटकातून मानवी भावभावनांचा वेध कवितेत घेतला गेला आहे त्याला झालेला आनंद , त्याला झालेले दु:ख , त्याचा मनातील एकटेपणा, विरहाची जाणीव , प्रेम , स्वार्थ , अशा भावना व्यक्त झालेल्या आहेत. इंदिरा संताच्या अनेक कविता निसर्गाकडून मानवी भावभावनांचा वेध घेणाऱ्या आहेत.

कवी कुसुमाग्रजांची ‘विराट वड’ या कवितेच्या माध्यमातून विराट वडाचे चित्र रेखाटत असतांना मानवी दु:खाचे चित्रण त्यांनी केले आहे.

गावाच्या सीमेवर नदीच्या तीरा
पारंब्या-फांद्याचा घालून डेरा
विषण्ण दृष्टीने देखत नभा
विराट वड हा राहिला उभा |

विराट वृक्षचे शब्दचित्र बघत असतांना एखाद्या मोठ्या संयुक्त कुटुंबातील तीन पिढ्या सोबत असलेल्या मोठ्या कुटुंबातील प्रमुखांची व्यथा असल्याचे सुद्धा जाणवते , उरलो फक्त उपकारा पुरता अशी त्यांची व्यथा आहे , अडगळीतील निरोपयोगी अजस्त्र वस्तू प्रमाणे त्याची अवस्था झालेली आहे केवळ जागा व्यापण्यापुरता तो मर्यादित झालेला आहे कुणालाही त्याच्या जवळ जावेसे वाटत नाही त्याची व्यथा जाणून घ्यावीशी वाटत नाही अशा भयावह अवस्थेत एकाकी जीवन त्याच्या वाट्याला आलेले आहे त्याचा भूतकाळ हा सुंदर होता पण वर्तमान काळ आणि भविष्यकाळ आता उरलेला नाही मरण्याची वाट पाहता जगणे एवढेच शिल्लक राहिलेले आहे.

एक काळ होता ज्यावेळी त्याने अनेकांना जगण्यासाठी बळ दिले, अनेक पिढ्या त्यांच्या समोरून पैलतीरावर गेल्याचे त्याने बघीतले, पण तो मात्र काळाशी झुंज देत एखाद्या विजेत्याच्या उन्मेषात उभा राहिला. पण हाच विजय त्याला आता जाचक ठरत आहे.राक्षसी खोडाला सहस्त्र तडे पडलेले आहे, पूर्वीचा मान आता त्याला राहिलेला नाही एकेकाळी असलेले देवत्व जाऊन एखाद्या विशाल पाषाणा प्रमाणे त्याची अवस्था झाली आहे नवं काही निर्माण करण्याची शक्ती काळाच्या ओघात नष्ट झाली आहे. पूर्वीच्या

पराक्रमाबद्दल आता त्याला गर्व राहिलेला नाही, तर त्या विजयाबद्दल एक प्रकारची खिन्नता त्याच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे त्याची पानेही जुनाट झालेली आहे त्याचे देठ तुटता तुटत नाही जुने पाच सहसा कधी सुटत नाही अशा अवस्थेत तो आहे.एकेकाळी आपल्या डौलाने वावरणाऱ्या विराट वडाला अवकळा आलेली आहे, एखाद्या घनदाट पानांच्या अंधेऱ्या गुहे सारखे जेथे सुर्यप्रकाशही पोहचत नाही,तेथे मोहळे लोंबकळत आहे जेथे कोळयांची जाळी लागलेली आहे, गिधाडे, घुबडे यांचा वावर जिथे आहे, कोकीळेचा मधुर स्वर केवळ स्मरणापूरता उरला आहे.त्यांच्या बद्दल नाना अफवा पसरलेल्या आहेत, रात्रीच्या वेळी खाली समंध बसतो, यामुळे त्याच्या जवळ कोणी येत नाही, लहान बालके त्यांच्या पासून दुर राहून भीतीयुक्त नजरेने त्याला पाहात असताना, अशा प्रकारचे उपेक्षित, तिरस्काराने भरलेले जीवन उमेदीच्या काळात सन्मानाने जगलेल्या पण वयामुळे थकलेल्या म्हाताऱ्याच्या वाट्याला येत असतो, बाहेर तर त्यांची उपेक्षा होते पण घरात देखील त्यांना मान मिळत नाही.

त्यामुळे मृत्यूची वाट पाहत जगणे एवढेच त्याच्या हातात राहिले आहे, रानात जेव्हा कुऱ्हाडीचे ध्वनी ऐकू येतात तेव्हा या मरणयातना पासून सुटका होईल असे त्याला वाटते पण ही हत्यारे त्यांच्या विशालकाय देहापुढे शुद्र आहेत , आता केवळ आकाशातील वीजच त्याची सुटका करु शकेल असे त्याला वाटते.

'स्टेशनवरचा चाफा' ही शांता शेळके यांची कविता चाफ्याचे वर्णन करतांना मानवाच्या वाटयाला येणाऱ्या नियतीचा वेध घेतांना ही कविता दिसते निसर्गाने चांगले गुण दिलेले असतांनाही बऱ्याचवेळा वाईट वातावरणात, वाईट संगतीत काळ व्यथित करावा लागतो.

चमचम करिती आगगाडिचे रूळ.

वातावरणी गलिच्छ भरली धूळ.

स्टेशनवर जेथे आगगाडिचे रुळ आहे, सर्वत्र गलिच्छपणा धुळ पसरलेली आहे , वातावरणात काजळी पसरवणारे गिरणीचे उंच धुरांडे, अशा या विपरीत वातावरणात हा सुंदर चाफा फुललेला आहे.हे बघून कवयित्रीच्या मनात प्रश्न निर्माण होतो परमेश्वराच्या जगातील ही कोणती वेगळीच रित आहे सुंदर आणि कुरुप अशी जोडी निर्माण केली

अशा असुंन्दर ठिकाणी हा चाफा असल्याने शृंगारात रममाण झालेली कोणती किशोरी या फुलांनी आपला साज शृंगार सजवायला तेथे येईल ? , कोणता रसिक त्याचे कौतुकाने अवलोकन करील एकंदरीतच त्यांच्या वाट्याला अपेक्षाच येईल. त्याला अनुकूल अशा ठिकाणी तो फुललेला असता वरती निळे आकाश, पक्षांचे मधुर , वाहणारा झरा, फुलांनी डवरलेले वेल अशा ठिकाणी तो फुलला असता तर तो चांगला योग आला असता पण वाट चुकून भलत्याच ठिकाणी पोहचलेल्या वाटसरू सारखी त्याची स्थिती झालेली आहे. इथे त्यांच्या वैभवाला किंमत नाही गिरणीच्या वासात त्याचा सुंगध कोंडलेला आहे. रुळावरून चालणाऱ्या गाडीखाली ती चिरडली जातात.

सुमने सुंदर खाली पडति गळुनी.

या लोखंडी निर्दय रूळांमधुनी

धावत येता अजस्त्र धूड वरून

चुरडुनि जाती, होती अन निष्प्राण.

ईश्वरी ईच्छा म्हणा मानवी नियती म्हणा चाफ्याच्या वाट्याला आलेला शोकांत अनेक सुकुमार स्त्रियांना भोगावा लागतो हुंडाबळी म्हणा किंवा वेश्या व्यवसायात पडलेल्या किंवा इतरही अनेक कारणांमुळे मुलींचा होणारा शोकांत डोळयासमोर येतो. अर्थाचे अनेक पदर या कवितेतून काढता येतात हे या कवितेचे बलस्थान आहे.

‘ बाभुळझाड’ ही वसंत बापट यांची वृक्षाच्या निमित्ताने मानवी भावना व्यक्त करणारी कविता आहे कवी म्हणतो.

अस्सल लाकूड , भक्कम गाठ

ताठर कणा टणक पाठ

वारा खात गारा खात बाभुळझाड उभेच आहे.

विपरीत परिस्थिशी झुंजण्याची ताकद बाबुळ झाडात दिसते. कालांतराने वयाच्या खूणा दिसायला लागतात देहाला फाटे फुटायला लागतात, शरिरातील तेज कमी होत जाते. पण अशाही स्थितीत जगावेच लागते.

जगले आहे, जगते आहे

काकुळतीने बघते आहे

खांद्यावरती सुताराचे घरटे घेऊन उभेच आहे.

वरुन जरी तो निश्चल दिसत असला तरी तरी आतल्या आत सुतारपक्षी त्याचे शोषण करत आहे.त्यांच्या आतील वेदना व्यथित करणाऱ्या आहे काही तरी सतत सलणारे वेदनादायी, आतल्या आत त्याला जाणवते, ‘आत काही कळते आहे, आत फार जळते आहे.’ अशी त्याची मनस्थिती आहे.

पण वरुन मात्र वाऱ्याशी गारांशी त्याची झुंज चालूच आहे कारण त्याचे लाकूड अस्सल आहे,कणा ताठ आहे या कवितेतून स्वाभिमानाने ताठ कणा ठेवून आयुष्य भर जगलेल्या एखाद्या व्यक्तीचे ते चित्रण वाटते.

औदुंबर ही बालकवींची अतिशय प्रसिद्ध अशी कविता अतिशय लयबद्ध असलेली काव्य रसिकांना भावलेली, अर्थातचे अनेक पापुद्रे असलेली समीक्षकांना आकर्षित करणारी अशी ही आहे,कविता आहे यातील लयबद्धता, निसर्गचित्र, चित्रमयता रसिक वाचकांना भावते, तर यातील आशय,गर्भितार्थ समिक्षकांना नवे शोधल्यावरचा आनंद देऊन जातो त्यामुळे ही कविता त्या अर्थाने चिरतरुण आहे.

ऐल तटावर पैल तटावर हिरवळ घेऊन

निळासांवळा झरा वाहतो बेटाबेटातुन.

माणसाच्या आयुष्यातील सुरवातीचा कालखंड हा मनस्वीपणे जगण्याचा असतो, जीवनातील नवनवीन वाटा तो चोखाळत जीवनातील अनुभव घेत पुढे जातो.चार घराच्या गावाप्रमाणे जीवनाचा प्रवास ठरलेला आहे बाल्यावस्था , किशोरवय , तारुण्य आणि वृद्धत्व या चार भागामध्ये जीवन विभागलेले असते.जीवन जरी संदर असले तरी मृत्यू हे शाश्वत सत्य आहे हे सांगताना बालकवी म्हणतात.

पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे.

हिरव्या कुरणामधुनि चालली काळया डोहाकडे.

काळा डोह म्हणजे जीवनाचा शेवट.आनंदमय जीवनाचाही शेवट दु:खदायक आहे.जीवनाचे मर्म समजलेला मनुष्य स्थितप्रज्ञ राहतो तो आनंदाने हुरळून जात नाही किवा मृत्यूची चाहूल लागल्यावर विचलित होत नाही. डोहाच्या काठावर बसलेला हा औदुंबर हा संन्यस्थ वृत्तीचा आहे सुख दु:खाच्या पलिकडे गेलेला स्थितप्रज्ञ झालेला, विरक्त झालेला आहे.

झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर

पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

त्याची सावली पाण्यात पडली आहे त्यामुळे लाटांवर गोड असा काळीमा पसरला आहे, अशा या जळांत ज्ञानस्थ, तपोमग्न महापुरुषाच्या प्रमाणे हा औदुंबर शांता चित्ताने जळात पाय टाकून बसला आहे.

निसर्ग सौंदर्याचे वर्णन करतांना कवि सुंदर फुलांनी डवरलेल्या,ज्याच्या सुवासाने आसमंत दरवळतो अशा चाफा,मोगरा, निशिगंधा, जाई आदी गोष्टी तिला मोहवून टाकतात.पण साध्या दिसणाऱ्या बाभळी सारख्या उपेक्षित, दुर्लक्षित साध्या झाडाची सुंदरता इंदिरा संत यांच्या सारखी एखादी कवयित्री बघु शकते.

हिरवी हिरवी गार पालवी

काट्याची वर मोहक जाळी.

घमघम करणारे पिवळे लोलक, काळोखा सारखी काळी काडी.

अशा साधेपणात तिचे सौंदर्य कवयित्रीला जाणवते.शहरीकरणा पासून दुर कुठेतरी बांधावर जराशी झुकून एकटीच उभी आहे. राघू, शेळया यांच्या सानिध्यात. अशा ठिकाणी एखाद्या बाल गुराख्या प्रमाणे तिथे कवयित्रीचे मन रमते.

‘या बकुळीच्या झाडाखाली’ हे वसंत बापट यांचे गीत त्यांच्या आठवणीतील बकुळीच्या झाडाला अतिशय महत्वाचे स्थान आहे.

या बकुळीच्या झाडाखाली आठवणींची लाख फुले.

इथेच माझी बाळ पाउलें दंवात भिजली बालपणी.

बालपणापासूच्या रम्य आठवणी पासून तर दुर देशीच्या युवराजाची येथेच भेटला.येथेच आपले दु:ख तीने व्यक्त केले या बकुळानेच हृदयामधला गंध दिला, सुखाचे दिवस दाखवले. ती तीची जीवलग सखी आहे, जन्म जन्मांतरीचे नाते आहे दोघी एकमेकांना बघून अतिशय आनंदित होतात कवीच्या मनातील बकुल हा सखीच्या आठवणींचा ठेवा आहे.

‘ईथे’ ही इंदिरा संत यांची निसर्ग वर्णन करणारी नितांतसुंदर कविता आहे.

आम्रतरु हा घरी शिरावर

प्रेमळ निज साऊली, मृदुल

सुंदर कोवळी पाने, पायातळी श्यामल हिरवळ. पुढे खडकातून चाललेला झरा आपल्या भोळया गीते म्हणण्यात रमलेला आहे, त्यांच्या काठावर सुंदर निळे गवत दिसते, त्यांच्या तुणांकुरांवर लहान लहान फुलपाखरे उडत आहे, निळया भुऱ्या डोंगराचा पाहारा आहे माध्यावर अगाध असे सुदंर आकाश आहे,

अशा ठिकाणी दुर्मिळ अशी शांती देहाला मिळते, जगाचा कोलाहल इथे पाहायला मिळत नाही, ईथे येणे हे अतिशय सुंदर स्वप्न.

‘ शांतविले मी तप्त जीवाला इथे कितीदा तरी.

कितिदा यावे तरी येथली अवीट ही माधुरी.

आम्रवृक्षाची गोडवी सांगणारी ही कविता अविस्मरणीय अनुभव देणारी आहे.

‘ चंदन’ ही रमाकांत जाधव यांची विद्रोही कविता या केशव मेश्राम यांच्या कवितासंग्रहातील आहे सामाजिक विषमतेची झळ कशी बसली याचे दु:ख या कवितेतून त्यांनी व्यक्त केली आहे.

चंदनाची झाडे निसर्गाने मानवासाठी निर्माण केली, पण त्याचा लाभ त्याला मिळाला नाही.

मलय पर्वतावर नाना तऱ्हेची सुंगधी झाडे;

आम्ही आहोत उन्हात पोळलेली झाडे.

जीवनाच्या शेवट  चितेवर शेवटी चिमूटभर चंदन दुरुनच फेकले जाते. तेव्हा आगीच्या सान्निध्यात असल्यामुळे घासलेट काय किंवा चंदन काय सारखेच. जिवंतपणी कुठलाच आनंद, सुख प्राप्त होत नाही 'चंदन'ही कृ.ब निकुंभ यांची प्रसिद्ध कविता चंदन हे त्यागाचे प्रतीक म्हणून ओळखले जाते चंदना प्रमाणे दुसऱ्या साठी देह झिजवणारे सदैव वंदनीय ठरतात. आपल्या मुलासाठी चंदनाच्या खोडा प्रमाणे देह जीने झिजविला ती आई त्या आईचे वर्णन या कवितेत आहे.

माझ्या वंदनी खोडाचा

मात्र झिजणे- झिजणे

उणे लिंपायला माझे

घाली सुगंधाचे लेणे.

चंदनापरी जिने आपला देह झिजविला, त्यामुळे माझ्यातील उणीवा झाकून सुंगधाचे लेणे मला बहाल झाले, तप्त जीवाला त्यामुळे उटी लावल्या प्रमाणे शांतता मिळते, मुलांचे सुख, त्याचे समाधान हीच खऱ्या अर्थाने तीची देवपूजा आहे.

तिचा त्याग पाहून, त्यांचा जीव गलबलून जातो, हात अडखळतात, आणि डोळयात पाणी तरारून येते.

वृद्ध  चंदन ते माझे

नित्य जपले, जपेन

त्याच्यासाठी, आण त्याची

जीव ठेवीन गहाण.

आईच्या कष्टाची महती कवीला समजलेली आहे. त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची त्याची तयारी आहे.

'गुलमोहर'ही अलिकडच्या काळातील कवी सचिन कुलकर्णी यांची कविता, विपरीत परिस्थितीत ठामपणे उभे राहून जगावे कसे हे त्यांच्या कडून शिकण्यासारखे आहे

'तप्त तप्त या धरतीवर

घट्ट रोऊनी आपले पाय'

कसे जगावे आणि रुजावे

गुलमोहर हा शिकवून जाय.

डोंगरावर, सागराच्या उष्ण तटावर हा गुलमोहर दिसतो, यातील मकरंदा साठी पाखरे नाद घालतात, वैशाख वणव्यातही तो गुलाबी तोरण लेवून रुबाबदार दिसतो, वैशाखा गुलमोहराचे सौंदर्य मनाला मोहिनी घालणारे असते.

‘ पिपय’ ही सुप्रसिद्ध मराठी कवी विठ्ठल वाघ यांची कविता गावातील पिंपळाची साक्ष देत असलेली दोन मैत्रिणीच्या मैत्रीच्या ओलाव्याची कहाणी यात आली, यातील एकीचे लग्न झाल्यामुळे ती गाव सोडून जाते, गावात मागे राहिलेल्या मैत्रीणीच्या मनातील भावना या कवितेतून व्यक्त झाली आहे.

‘गाव सोळून चालली तुवा पालखीत पाय

मैना उळून गेल्यानं माहा उदास पिपय-

तीला तीच्या सोबतीचे दिवस आठवतात ऊन सावलीत मनसोक्त खेळणे, होळीच्या रंगात फुलारलेलं अंग, त्यांच्या तनमनाला लागलेला रंग बघून इंद्रधनुष्याचा धनी असलेले आभाळ सुद्धा लाजले असावे.

कोजागिरीच्या रात्री तीला न जमलेली फुगडी, आभाळाशी नाते सांगणारा पाळणा, आंब्याच्या डहाळीला झोके घेत गेलेले बालपण, भुलाबाईच लग्न या बालपणीच्या आठवणी आता उरलेल्या आहेत.

तीला एकटे पाहून नदीच्या काठचे चिंच सुद्धा गलबलून जाते

चिंच नदीच्या काठची तिची मायाळू सावली.

मले एकल पाहून गलबलीनं माऊली

तिचा गयतां फुल्लोर एकडाव तरी पाय.

पिंपळ, वड , चिंच या ग्रामीण जीवनातील अविभाज्य भाग असलेल्या वृक्षांच्या सान्निध्यात बहरलेल्या आणि आता त्याच्यांतील विरहाच्या दु:खात सहभागी असलेले हे वृक्ष त्याचा अतिशय चपखलपणे उपयोग कवीने या कवितेत केला आहे.

अशा प्रकारच्या अनेक कविता मराठी व इतरही भाषांमध्ये आढळतो मानवाच्या सुखद आणि दुखद आठवणी वृक्षाच्या माध्यमातून व्यक्त झालेल्या आहेत.मराठीतील काही कवितांचा उहापोह प्रस्तुत लेखातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संदर्भ :-

आजची मराठी कविता :-संपा वसंत बापट

अर्वाचीन मराठी कविता :- संपादक डॉ गजानन जाधव राघव प्रकाशन २०१७

ऋतुरंग :- संपादक डॉ विजय जाधव प्रथमवृत्ती २०२२

मृद्गंध भाग ३ राघव पब्लिशस अँड डिस्ट्रिब्युटर्स